Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V | Issue-I | JANUARY | 2018 | ISSN 2349-638x | Impact Factor 4.574

# प्राचीन भारतातील लोकशाहीचे विश्लेषण

**प्रा.डॉ.आर.बी. लक्षटे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर

लोकशाही एक अशी शासन व्यवस्था आहे. ज्यात जनता स्वत: आपला शासक निवडते. लोकशाही हा शब्द लोकशाही व्यवस्था आणि लोकशाही राज्य दोन्हीसाठी योग्य आहे. पंरतु लोकशाही शब्दाचा वापर राजकीय संदर्भाने केला जातो. तसेच लोकशाहीचा सिध्दांत इतर समूह आणि संघटनासाठी योग्य आहे. सामान्यत: लोकशाही विभिन्न सिध्दांताच्या मिश्रणातून बनते. मतदान लोकशाहीच्या अधिकांश प्रकाराचे प्रमुख लक्षण मानले जाते.

**लोकशाहीचे प्रकार :**

लोकशाहीच्या व्याख्येनुसार ते लोकाकडून लोकासाठी लोकांचे शासन आहे. परंतु वेगवेगळया देशात आणि परिस्थितीत वेगवेगळया प्रयोगामुळे काही गुंतागुंतीची बनली आहे. प्राचीनकाळापसूनच लोकशाही विषयीचे अनेक प्रस्ताव मांडण्यात आले. परंतु त्यापैकी कोणतेही कार्यान्वित झाले नाही. वर्तमान जागतिक लोकशाही शासन व्यवस्थाकडे नजर टाकता खालील प्रकारात लोकशाही विभागल्याचे जाणवते.

१) प्रातिनिधीक लोकशाही २) उदारमतवादी लोकशाही ३) प्रत्यक्ष लोकशाही

**१) प्रतिनिधीक लोकशाही :**

या लोकशाहीत जनता मतदानातून शासकीय प्रतिनिधीची सरळ निवड करते. प्रतिनिधी जिल्हा किंवा संसदीय मतदान संघातून निवडले जातात. तसेच इतर समानुपतिक व्यवस्थेतून सर्व मतदारांचे प्रितिनिधीत्व करतात. काही देशात मिश्रीत व्यवस्था आहे. या दोन्हीत प्रतिनिधी जनतेव्दारे निवडले जातात. पंरतु जन हितार्थ कार्य करण्याचे धोरण प्रतिनिधी स्वत: ठरवतात. पक्षांतर्गत धोरण, मतदारांत प्रतिष्ठा, वारंवार निवडणूका असे काही घटक पतिनिधींवर प्रभाव टाकतात. पंरतु साधारणत: यातील काहीच बाह्यकारी आदेश असतात. या व्यव्यस्थेचे सर्वात मोठे लक्षण आहे की, लोकमताचा दबाव धोरणात्मक प्रक्रियेला थांबवण्याचे व त्याला नियंत्रीत करण्याचे कार्य करते. कारण एका विशिष्ट अंतराने सत्तेच्या वैधतेसाठी निवडणूका अनिवार्य असतात.

**२) उदारमतवादी लोकशाही :**

उदारमतवादी लोकशाही एका प्रकारे प्रतिनिधीक लोकशाही आहे. ज्यात स्वच्छ आणि निष्पक्ष निवडणूका होतात. उदारमतवादी लोकशाहीत चारित्र्य, अल्पसंख्यांची सुरक्षा,कायदयाची व्यवस्था व सत्तेचे वितरण याशिवाय अभिव्यक्ति,भाषा, सभा, धर्म आणि संपत्तीचे स्वातंत्र्य प्रमुख असते.

**३) प्रत्यक्ष लोकशाही :**

प्रत्यक्ष लोकशाहीत सर्व नागरीक संपूर्ण महत्वपुर्ण धोरणात्मक निर्णयावर मतदान करतात. या व्यवस्थेत सैध्दांतिक दृष्टया कोणी प्रतिनिधी किंवा मध्यस्त नसतो. प्राधान्याने प्रत्यक्ष लोकशाही लहान समुह किंवा नगर - राष्ट्रांत यशस्वी होत असते. उदा : स्वित्झर्लंड

**भारतात लोकशाहीचे प्राचीन प्रयोग :**

प्राचीन भारतात आम्हास वर्तमान लोकशाही समान सक्षम व सदृढ व्यवस्था स्पष्टपणे आढळते. ज्याची साक्ष प्राचीन साहित्य, सिक्के अभिलेख, ताम्रपटातून प्राप्त होते. परकीय अभ्यासक, प्रवासी व विव्दांनानी भारताचा दौरा केला त्यांच्या विवेचनातून ही बाबत प्राधान्याने जाणवते. प्राचीन गणतंत्र व्यवस्थेत आजच्या प्रमाणे शासक व शासनातील इतर पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी निवडणूक प्रणाली होती. योग्यता व गुणवत्तेच्या आधारावर त्यांची निवड प्रक्रिया राबवली जात. जी आजच्यापेक्षा थोडीसी वेगळी होती. परंतु तेव्हा आजच्याप्रमाणे सर्वच लोकांना मतदानाचा अधिकार नव्हता.

ज्याच्य उल्लेख ऋग्वेद आणि कौटिल्याच्या साहित्यात स्पष्टपणे आढळतो. परंतु त्यांनी मतदान देण्याच्या अधिकारावर प्रकाश टाकला नाही. वर्तमान संसदेप्रमाणे प्राचीन काळात परिषदांची निर्मिती केली होती. जे वर्तमान संसदीय प्रणालीशी मिळते-जुळते होते. गणराज्य किंवा संघाच्या धोरणांचे संचलन या परिषव्दारेच होत असत. या परिषदांची सदस्य संख्या अधिक होती. त्याकाळातल्या प्रसिध्द गणराज्य लिच्छविच्या केंद्रीय परिषदेची सदस्य संख्या ७७०७ होती. तर यौधेयच्या केंद्रीय परिषदेची ५००० सदस्य संख्या होती. वर्तमान संसदीय सत्राप्रमाणेच परिषदांचे अधिवेशन नियमित होत असत.

कोणत्याही विषयावर निर्णय होण्याआधी सदस्यात त्यावर खुली चर्चा होत. योग्य-अयोग्याच्या सत्यतेसाठी समर्थनार्थ व विरोधात चर्चा होत. त्यानंतरच सर्व संमतीने निर्णय घेतल्याचे प्रतिपादन केले जात. सर्वाचे सहमत झाले नसल्यास बहुमताची प्रक्रिया अवलंबली जात. काही ठिकाणी तर सर्व संमतीने निर्णय होणे अनिवार्य होते. बहुमताने घेतलेल्या निर्णयास भूधि सिक्किम म्हणत. त्यासाठी मतदानाचा आधार घ्यावा लागत असत. त्याकाळात मतदानास छंद म्हणत. वर्तमान निवडणूक आयुक्ताप्रमाणेच निवडणूकीची देखरेख करणारा एक अधिकारी असत. ज्यास शलाका ग्राहक म्हणत. तत्काळात मतदान देण्याच्या तीन पध्दती होत्या.

१) गुप्त पध्दत : म्हणजेच आपले मत कोणत्याही एका पत्रकावर लिहणे ज्यात मतदान करणाऱ्या व्यक्तीचे नाव असत.

२) खुल्या पध्दती : या प्रक्रियेत व्यक्ति संबंधित विषयाप्रति आपले विचार सर्वांच्या समोर मांडत.त्याची खुले आम घोषणा करत.

३) संकर्ण जल्पक :(शलाका ग्राहकाच्या कामात गुपचुप बोलणे ) तत्काळातील सदस्य वरीलपैकी कोणत्याही एका प्रक्रियेचा स्विकार करण्यास स्वतंत्र होते.शलाका ग्राहक पुर्णपणे स्वतंत्र आणि इमानदारीने मतदानांचा हिशोब ठेवत.

अशा प्रकारे प्राचीन काळातच आमच्या देशात लोकशाहीची गौरवशाली परंपरा होती. याशिवाय सुव्यवस्थित शासनाच्या संचालना हेतू अनेक मंत्रालयाची निर्मिती केली जात. उत्तम गुण आणि योग्यतेच्या आधारावर या मंत्रालयातील अधिकाऱ्यांची निवड होत असत. औद्योगिक किंवा शिल्पसंबंधी विभाग, परदेश विभाग, जनगणना व क्रयविक्रयांच्या नियमांचे निर्धारण इ. मंत्रालयाचे प्रमुख विभाग होते. मंत्रिमंडळाचा उल्लेख अर्थशास्त्र, मनुस्मृती,शुक्रनीती, महाभारत इ.तून प्राप्त होते. यजुर्वेद आणि ब्राम्हण ग्रंथात त्यांना रत्नी म्हटले. महाभारतानुसार मंत्रिमंडळात ६ सदस्य असत. मनुनुसार ही सदस्यसंख्या ७-८ होती. शुक्रांने त्यासाठी १० ही संख्या निर्धारित केली. मंत्रिमंडळातील या सदस्यांच्या कार्याबाबतही स्वंतत्रपणे वरील साहित्यातून प्रकाश टाकला आहे. ज्याचे स्पष्टीकरण मंत्रीमंडळातील सदस्यांच्या नामाभिधानावरुन अधिक स्पष्ट होते.

पुरोहित :यास राजचा गुरु मानले. राजकारण आणि धर्म या दोन्हीत निपुण असणाऱ्या व्यक्तिस हे पद दिले जात.
उपराज : ज्याचे कार्य राजाच्या अनुपस्थितीत शासन व्यवस्थेचे संचलन (राजप्रतिनिधी) करण्याचे होते.
प्रधान : प्रधान किंवा प्रधानमंत्री मंत्रीमंडळाच्या सर्वात महत्वपुर्ण सदस्य होता.
सचिव : वर्तमानातील सुरक्षा मंत्र्याप्रमाणे याचे कार्य राज्याची सुरक्षा व्यवस्थेसंबधीकार्यावर नियंत्रण व लक्ष ठेवण्याचे असत.
सुमंत : राज्याच्या जमा-खर्च,नफा-खर्चाचा हिशोब ठेवण्याचे कार्य हा करत चाणक्याने यास समर्हता म्हटले.
अमात्य : अमात्याचे कार्य संपूर्ण राज्याच्या नैसर्गिक व पायाभूत साधन सपत्तीचे नियमन करण्याचे होते.
दूत : वर्तमान काळातील इंटलीजेंसी ब्युरोप्रमाणे दुताचे कार्य गुप्तचर विभागाला संघटित करण्याचे होते. राज्याचा हा अत्यंत महत्वाचा व संवेदनशील विभाग म्हणून ओळखला जात.

याशिवायही इतर अनेक विभाग होते. तसेच वर्तमान काळाप्रमाणेच पंचायती व्यवस्था आपणस पहाण्यास मिळते. शासनाचा मुलभूत धटक गावालाच मानत असत. प्रत्येक गावात एक ग्रामसभा असत. जी गावच्या प्रशासक, न्याय व्यवस्थेपासून प्रत्येक लोक कल्याणकारी कार्यास अंतिम रुप देत. जीचे कार्य गावच्या प्रत्येक समस्येला सोडवण्याचे असत. आर्थिक प्रगती, सुरक्षिततेचे कार्य, संपन्न व सुदृढ शासन व्यवस्थेची स्थापना करुन आदर्श गाव निर्माण करणे. ग्रामसभेच्या प्रमुखास ग्रामीण म्हणत. आज आपण त्यास सरपंच म्हणतो. संपूर्ण राज्य लहान-लहान शासन अंगात विभागले होते. प्रत्येक भागात एक लहान राज्यासमान होते.

स्थानिक शासनाबाबत हे स्वंयपुर्ण होते. संपूर्ण राज्याची शासन सत्ता एका सभेच्या अधिन होती. या सर्व शासनाच्या अंगाचे प्रमुख त्या सभेचे सदस्य होते. एका विशिष्ट काळासाठी सर्वांचा एक मुख्य किंवा अध्यक्ष निवडला जात. जर सभा मोठी असेल तर तिच्या सदस्यातूनच काही लोकांची मिळून एक कार्यकारी समिती निवडली जात. अशी शासन व्यवस्था अथेन्समधील क्लाइस्थेनीजच्या संविधानाशी मिळती- जुळती होती. सभेत युवक आणि वृध्द सहभागी होते. त्यांच्या बैठका एका भवनात होत. ज्यास सभागृह संबोधत. एका प्राचीन उल्लेखानुसार अपराध्यास प्रथम विचारपुस करण्यासाठी विनिश्चय महामात्र नावाच्या अधिकाऱ्याकडे हजर केले जात. निरापराध असणाऱ्यास ते मुक्त करत असत. परंतु तो त्यास दंड करत नसत. त्यास आपल्यापेक्षा वरच्या व श्रेष्ठ न्यायालयाकडे पाठवत. अशाप्रकारे अभियुक्तास सहा उच्च न्यायालयासमोर उपस्थित व्हावे लागत. फक्त राजालाच दंड देण्याचा अधिकार होता. धर्मशास्त्र आणि पुर्वीच्या निर्णयाच्या आधाराने दंड दिला जात. देशात अनेक गणराज्य होते. परंतु मौर्य साम्राज्याचा उदय या गणराज्यासासाठी विनाशकारी सिध्द झाला. मौर्य साम्राज्याच्या चैतन्यानंतरही काही नवीन लोकशाही राज्यांचा उदय झाला. ज्यात यौधेय, मानव आणि आजुनीयन इ. चा उल्लेख केला जातो.

प्राचीन भारताच्या इतिहासात काही प्रस्तुत गणराज्य कशा स्वरुपाचे होते ते जाणून घेवू. शाक्य : शाक्य गणराज्य वर्तमानातील वस्त्री आणि गोरखपूर जिल्हयाच्या क्षेत्रात येते. जे सध्या उत्तर प्रदेश राज्यात आहे. या गणराज्याची राजधानी कपिलवस्तु होती. जे सुंदर आणि सुरक्षित नगर होते. या संघात ८० हजार कुळ आणि पाच लाख लोक होते. यांच्या राज्यसभा म्हणजेच शक्य परिषदेची ५०० सदस्य होते. यास सन्यागार म्हणत. याठिकाणी अभ्यासक व अभिन्न विचार विनिमय करुन निर्णय देत. शाक्य परिषदेचा अध्यक्ष राजा असत. भगवान कौशल्याचे राजा प्रसेनजितचे पुत्र विडक्घभने या गणराज्यावर आक्रमण करुन त्यास नष्ट केले.

**१) लिच्छवि :** लिच्छवि गणराज्य गंगेच्या उत्तरेकडील भागात होते. जे सध्या बिहार राज्याच्या उत्तरेकडील भागात येते. ज्याच्या राजधानीचे नाव वैशाली होते. बिहार राज्यातील मुजफ्फरपुर जिल्हाच्या बलाढय गावात त्याचे अवशेष मिळतात. लिच्छवि क्षत्रिय वर्णाचे होते. वर्धमान महाविराचा जन्म याच गणराज्यात झाला. या गणराज्याच्या उल्लेख व वर्णन जैन व बौध्द ग्रंथात प्रामुख्याने आढळतो. वैशाली च्या राज्य परिषदेत ७७०७ सदस्य होते. यावरुनच त्याच्या विशालतेचा अंदाज येतो. शासनाचे कार्य करण्यासाठी दोन समित्या होत्या. पहिल्या समितीत नऊ सदस्य होते. जे परराष्ट्र संबंधाची देखभाल करत. दुसऱ्या समितीत आठ सदस्य होते. जी प्रशासनाच्या संलचनाचे कार्य करत. ज्यास इष्टकुल म्हणतात. या व्यवथेत तीन प्रकारचे विषय तज्ञ होते. एक विनिश्चय महामात्र, व्यावहारिक आणि सुत्राधार.लिच्छवि गणराज्य तत्काळातील अधिक शक्तीशाली राज्य होते. बऱ्याचवेळा यावर आक्रमणे झाली. शेवटी मगधराज अजातशत्रुने यावर आक्रमण करुन त्यास नष्ट करुन टाकले. परंतु चौथ्या शतकात ते पुन्हा एक शक्तीशाली गणराज्य बनले.

**२) वज्जि :** लिच्छवि विदेह, कुंडग्रामच्या ज्ञातक गण आणि पाच लहान गणराज्यापासून मिळून जे संघ बनले त्यास वज्जि संघ म्हणतात. मगध शासकांनी नेहमी यावर आक्रमण केले. शेवटी हा संघ मगधच्या अधीन झाला.

**३) अम्बह :** पंजाबमधील या गणराज्याने सिकंदर सोबत युध्द न करता संधी केली होती.

**४) अग्रेय :** वर्तमान अग्रवाल जातिचा विलास या गणराज्यातूनच झाला. या गणराज्याने सिकंदराच्या सैन्याचा बहादुरीने सामना केला. जेव्हा त्यांच्या लक्षात आले की ते युध्दात विजयी होवू शकत नाहीत तेव्हा त्यांनी स्वत: आपल्या नगरास जाळून टाकले.याशिवाय अरिष्ट, औदुंबर,कठ, कुगिंद, क्षुद्रक, पातान, प्रस्थ इ. गणराज्याचा उल्लेख प्राचीन ग्रंथात सापडतो.

याशिवाय वर्तमान भारतीय लोकशाहीशी मिळते जुळते लोकशाहीची लक्षणे व संकेत महात्मा गौतम बुध्दाच्या विहारात आढळतात. आज लोकशाही शासन व्यवस्थ जनहितार्थ एखादा निर्णय किंव विधेयक पास करण्यासठी ज्या प्रक्रियेचा अवलंब करते ती प्रक्रिया बुध्दांच्या विहारात आढळते. याशिवाय १२ व्या शतकात महात्मा बसवण्णांच्या अथक प्रयत्नाने निर्माण झालेले कल्याण शहर लोकशहीचा उत्तम नमुना आहे. बसवण्णा स्थापित अनुभवमंटप वर्तमान संसदेचे प्रारुप आहे.

जे सदस्य निवड, कार्यप्रणाली, सदस्य, स्त्री-पुरुष प्रमाण, निर्णय निर्धारण पध्दती, कामकाजाचे स्वरुप इ. बाबत तुलनात्मक विचार करता वर्तमान संसदेपक्षा श्रेष्ठ व श्रेयस्कर ठरते. आजच्या भारताच्या लोकनियुक्त सभागृहात ५५२ सभासद आहेत. अनुभवमंटपात ७७० सभासद होते जे शक्य गणराज्याच्या परिषदापेक्षा अधिक होते. बसवण्णा स्थापित अनुभवमंटप बहुआयामी संस्था आहे. जी आदर्श नागरीकांच्या निर्मिती करण्यापासून आदर्श समाजमन व लोकशाहीस पोषक जनमत निर्माण करण्यावर भर देत नसून ते प्रत्यक्षात उतरवते. वर्तमान संसद फक्त कायदेपास करण्याचे केंद्र बनले. त्यासही वारंवार न्यायालयीन यंत्रण निर्देशीत व मार्गदर्शन करते.

**संदर्भ :**

१) प्राचीन भारत का इतिहास : डॉ. कैलाश खन्ना -अर्जुन पब्लिशिंग हाऊस - नई दिल्ली-२००३,

२) भारत का इतिहास - प्रागैतिहासिक काल से आधुनिक काल तन-मनिक काल गुप्त- एटलांटिक पब्लिशर्स एण्ड डिस्टीब्युटर्स - नई दिल्ली-२००३

३) प्राचीन भारतीय राजकीय विचार आणि संस्था - डॉ. रामशरण शर्मा-अनुवाद-डॉ. पंढरीनाथ रानडे,डायमंड पब्लिकेशन्स पुणे-२००६
४) प्राचीन भारत का राजनैतिक एवं सांस्कृतिक इतिहास : डॉ. कालुराम शर्मा, डॉ.प्रकाश व्यास - पंचशील प्रकाशन,-जयपुर २००४
५) प्राचीन भारत में राजनीतिक विचार एवं संस्थाएं - रामशरण शर्मा - राजकमल प्रकाशन नई दिल्ली-१९९०
६) प्राचीन भारत में सम्प्रभुता का विकास (वैदिक काल से गुप्तकाल तक) राकेश शर्मा - अम्बे पब्लिकेशन्स - नई दिल्ली-१९९६

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com